**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक २३.०६.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २२.०६.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये २४ केसेसमध्ये ३१ ईसमांवर कारवाई करून ३,८९,७४२/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०१ केसमध्ये ०१ ईसमांवर कारवाई करून ८००/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,७३७ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,३४,५००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) भांडेवाडी पोलीसांची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक २२.०६.२०२६ चे २०.१५ वा. ते २२.५० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे भांडेवाडी येथील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे **अंमली पदार्थ विरोधी सप्ताह मोहीम** राबवित असतांना, पेट्रोलींग दरम्यान त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून पाळत ठेवून बिडगाव ते तरोडी रोडवर सारस बार ॲण्ड रेस्टॉरेन्टजवळ मारूती सुझुकी वॅगनार कार क्र. एम.एच ४९ बी.झेड २८३० चे चालकास थांबवुन, पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव संदीप गुलाबराव हारोडे, वय ३६ वर्षे रा. प्लॉट नं. ४०, धनलक्ष्मी सोसायटी, विनोबा भावे नगर, भांडेवाडी, नागपूर असे सांगीतले. त्याचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन त्यांची व कारची झडती घेतली असता, त्यांचे ताब्यातुन झिपलॉक पन्नीत एकुण ४.८९ ग्रॅम एम.डी. पावडर मिळुन आली. आरोपीचे ताब्यातुन रोख १२०/—रू., एम.डी. पावडर, ०१ मोबाईल, व वॅगनार कार असा एकुण ५,१९,९२०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे भांडेवाडी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र.५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. नितीन चरडे, पोउपनि. दिपक चालूरकर व त्यांचे तपास पथकाने केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे वाठोडा :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २२.०६.२०२६ चे २२.३० वा. चे सुमारास, फिर्यादी भुपेंद्र दिनेश देव्हारे, वय ५० वर्षे, रा. प्लॉट नं. १४, तुळजाई नगर, गारगोटी वस्ती, हुडकेश्वर हे त्यांचे नातेवाईक शुभम हरीराम तरारे, वय ३० वर्षे, रा. गारगोटी, नरसाळा रोड, हुडकेश्वर, नागपूर यांचेसह शुभमचा मित्र मोपेड क्र. एम.एच ३१ बी.ई १८३७ चा चालक याचे सोबत मोपेडवर मागे बसून त्रिपल सिट जात असता, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत, दिघोरी चौक ते उमरेड रोडने, कुल्लरकर कॉम्प्लेक्ससमोर त्यांचे मागून येणाऱ्या एका पांढऱ्या रंगाचे ट्रव्हल्स बस चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादी व शुभम बसलेल्या मोपेडला धडक देवुन, पळून गेला. अपघातात शुभम हे गंभीर जखमी झाले त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल, येथे नेले असता डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाठोडा येथे पोउपनि. जहीद मोमीन ८४८४९१२१९१ यांनी अज्ञात ट्रॅव्हल्स बस चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१), २८१ भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे बेलतरोडी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २०.०६.२०२६ चे ०८.०० वा. ते २१.०६.२०२६ चे १०.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत, प्लॉट नं. १७, दत्तनगर, हनुमान मंदीरजवळ, बेसा, नागपुर येथे राहणारे फिर्यादी सुशील हरीहरप्रसाद पांडे, वय ६२ वर्षे हे आपले राहते घराला कुलूप लावून परिवारासह गोंदिया येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडून आंत प्रवेश करून, लोखंडी आलमारीत ठेवलेले रोख १०,०००/—रू. व सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने तसेच सी.सी.टी.व्ही कॅमेरे असा एकुण किंमती १,५२,५००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे मपोउपनि. चौधरी ७९७७४५००७८ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे कळमना :—** दिनांक २१.०६.२०२६ चे ०६.०० वा. चे सुमारास, ईसम नामे लवनेश गुलाबचंद जनवारे, वय ३० वर्षे, रा. कळमना मार्केट, पारडी उड्डाणपूलाजवळ, नागपूर हे आपले साफसफाईचे कामाकरीता सायकलने जात असता, पोलीस ठाणे कळमना हद्दीत कळमना मार्केट, पारडी पूलाजवळ एका अज्ञात ट्रक चालकाने त्याचे सायकलला धडक दिल्याने ते जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल, येथे नेले असता डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे कळमना येथे पोउपनि. सौरभ बुधे ९०२२१८५९१८ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>पोलीस ठाणे हुडकेश्वर</u> :–** दिनांक २२.०६.२०२६ चे १२.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत, प्लॉट नं. ३११, गाणारचे घरासमोर, फुटपाथवर, जवाहरनगर, मानेवाडा रोड येथे एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ५५ वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल वॉर्ड क्र. ५२ येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना १५.४५ वा. तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

यात्प्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि. प्रदीप कुंभारे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**